म. शि. प्र. मंडळाचे

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई

# राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम अहवाल

## २०२०—२१

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने महाविद्यालय स्तरावर शैक्षणीक वर्ष २०२०—२१ मध्ये जे विविध कार्यक्रम राबवण्यात आले. त्याचा सक्षिप्त अहवाल पुढील प्रमाणे.

**१. कोविड —१९ विषयी जागृती अभियान :**

नोव्हेबर २०१९ च्या दरम्यान कोरोना विषानुच्या संसर्गाच्या रूपाने जगावर फार मोठी आपत्ती आली. पाहता पाहता या महामारीने भारतालाही ग्रासले. त्या नविन रोगाविषयी समाजात जागृती करणे आवश्यक होते. म्हणून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दि. २०.०४. २०२० रोजी महाविद्यालय परिसर, शहरातील मुख्य ठिकाणी तसेच दत्तक ग्राम मैजे सेलु आंबा या ठिकाणी कोरोना रोगाविषयी जागृती करणारे पोस्टर लावण्यात आले. तसेच सोशल मेडीयाच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी कोरोना रोगाविषयी जागृतीपर व्हिडीओ तयार करून समाज जागृती केली.

**२. गरजवंताना धान्य वाटप :**

कोरोना महामारीचा प्रसार रोकण्यासाठी शासनाने मार्च २०२० मध्ये टाळेबंदी केली. त्यामुळे आर्थीक दृष्या कमजोर लोकांच्या उदरभरणाचा प्रश्न निर्माण झाला होता. त्या परिस्थीत त्यांना आधार देण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दि. ०९.०५.२०२० रोजी शहरातील टाळेबंदीमुळे अडचणीत असलेल्या लोकांना गहु वाटप करण्यात आले. त्यावेळी महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य पी. के. जाधव, डॉ. मुकुंद राजपंखे, डॉ. दिलीप भिसे, डॉ. इंद्रजीत भगत, डॉ. अनंत मरकाळे उपस्थीत होते.

**३. आंतरराष्ट्रीय योग दिन :**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाईच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दि. २१ जून २०२० रोजी कोविड –१९ पार्श्वभुमीवर ऑनलाईन पध्दतीने योग दिन साजरा करण्यात आला. या योग शिबीरास प्रा. तत्तापुरे जे. जी. यांनी ऑनलाईन योग प्रात्याक्षिक करून मार्गदर्शन केले. या शिबीरास प्राचार्या वनमाला गुंडरे, उपप्राचार्य डॉ. दिनकर तांदळे, कार्यक्रमाधिकारी डॉ. इंद्रजित भगत, डॉ. अनंत मरकाळे महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी ऑनलाईन उपस्थित होते.

**४. आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन साजरा :**

दि. ०८ सप्टें, २०२० राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आंतराष्ट्रीय साक्षरता दिन ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला. या याकार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. अहिल्या बरुरे यावेळी मार्गदर्शन करतांना त्या म्हणाल्या की, महिला जर साक्षर झाली तर संपुर्ण कुटुंब साक्षर होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे या कार्यक्रमाच्या अध्यक्षा होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी त्या म्हणाल्या की, समाजात साक्षरतेचे प्रमाण वाढणे आवश्यक आहे. कार्यक्रमाचे संचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. अनंत मरकाळे यांनी केले तर आभार डॉ. इंद्रजित भगत यांनी मांनले. याप्रसंगी डॉ. दिलीप भिसे, डॉ. रमेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**५. मराठवाडा मुक्ती संग्राम दिन :**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यवतीने १७ सप्टेंबर २०२० रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला. या याकार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून जेष्ठ इतिहास तज्ज्ञ डॉ. साहेबराव गाठाळ हे होते. त्यांनी मराठवाडा मुक्ती संगामाचा अज्ञात इतिहास समाजासमोर मांडला. मराठवाडयाच्या इतिहासावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे होत्या. तसेच ा कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. मुकुंद राजपंखे यांनी केले.

**६. राष्ट्रीय सेवा योजना दिन :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापना दिनानिमित्त २४ सप्टेंबर २०२० रोजी महाविद्यालयात ऑनलाईन पध्दतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध गजलकार डॉ. मुकुंद राजपंखे हे उपस्थित होते. तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ. वनमाला गुंडरे ह्या होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनंत मरकाळे यांनी केले. त्यांनी

राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास सांगून, राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्देश सांगितले.यानंतर प्रमुख मार्गदर्षक प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्वय:शिस्तीने स्वत:चे काम स्वत: करायला पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्याचे आयुष्य घडवते. राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांना विकासाची एक संधी आहे. विद्यार्थ्यांनी व्यक्त व्हायला शिकले पाहिजे. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. वनमाला गुंडरे म्हणाल्या की, युवा शक्तीला योग्य दिशा देण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली आहे. म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आलेली शिस्त विद्यार्थ्यांना वैयक्तीक व सामाजिक जीवनात महत्वाची आहे. या कार्यक्रमाचे आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. इंद्रजीत भगत यांनी मानले. तर या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संकेत मुळे या विद्यार्थ्याने केले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक उपस्थित होते.

**७. महात्मा गांधी व लालबहादुरशास्त्री जयंती :**

दि. ०२ ऑक्टोंबर २०२० रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यवतीने महात्मा गांधी व लालबहादुरशास्त्री जयंती साजरी करण्यात आली. या निमीत्त जेष्ठ विचारवंत श्री चौसाळकर कोल्हापूर यांचे ऑनलाईन पध्दतीने व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी महात्मा गांधी यांच्या विविध पैलुवर प्रकाश टाकला. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. वनमाला गुंडरे म्हणाल्या की, महात्मा गांधी यांचे जीवन चरित्र सत्याचे प्रयोग हे आजच्या तरुणासाठी प्रेरणादायी आहे. महात्मा गांधी यांच्या पासून प्रेरणा घेवून युवकांनी आपले कार्य करावे. याप्रसंगी विद्यार्थ्यांना तंबाखू मुक्तीची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. अनंत मरकाळे यांनी केले. तर आभार डॉ. इंद्रजित भगत यांनी मानले. महाविद्यालयातील प्राध्यापक व स्वयंसेवक मोठ्या संख्येने ऑनलाईन उपस्थित होते.

**८. परिक्षार्थ्यांना सॉनिटाइझ करणे :**

कोरोना महामारीच्या पार्श्वभुमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या मार्च/एप्रिल २०२० च्या लांबलेल्या परिक्षा ऑक्टोबर २०२० मध्ये घेण्यात आल्या. त्यावेळी विद्यार्थ्याची कोरोना रोगापासून सुरक्षा व्हावी म्हणून राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यवतीने विद्यार्थ्यांना सॉनिटाइझर देण्यात आले. तसेच दि. २६.१०.२०२० रोजी वर्ग खोल्यांमध्ये सॉनिटाइझर फवारणी करण्यात आली.

**९. संविधान दिन :**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यवतीने २६ नोव्हें २०२०रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. यानिमीत्त ऑनलाईन पध्दतीने डॉ. दिनकर तांदळे यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला राज्यघटनेच्या प्रास्ताविकाचे सामुहीक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे होत्या. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. दिनकर तांदळे यांनी राज्य घटनेविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. इंद्रजित भगत व सूत्रसंचालन डॉ. अनंत मरकाळे यांनी केले तर आभार रा.से.यो. स्वयंसेवक तनुजा देशमुख हिने मानले. तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यवतीने राज्य घटनेवर आधारीत प्रश्न मंजुषा घेण्यात आली. त्यामध्ये गुणानुक्रमे येणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषीक देवून मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले.

**१०. जागतिक एड्स दिन जनजागृती उपक्रम :**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने १ डिसेंबर २०२० रोजी एड्स जनजाग्रण कार्यक्रमांतर्गत स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयातील वैद्यकीय पथकाने स्वयंसेवकांची एड्स तपासणी केली. तसेच डॉ. दिलीप भिसे यांनी एड्स रोगाविषयीचे समज व गैरसमज या विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे होत्या. त्यानंतर एड्स रोगाविषयी माहिती देणाऱ्या पोस्टरचे प्रदर्शन करण्यात आले. तसेचविद्यार्थ्यांसाठी रांगाळी स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती. त्यामाध्यमातून विद्यार्थ्यांनी एड्स रोगाविषयी जागृती करणाऱ्या रांगोळया सादर केल्या.

**११. स्वच्छता अभियान :**

रोजी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. व्ही. जी. गुंडरे, यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १६.१२.२०२० रोजी कार्यक्रमाधिकारी डॉ. इंद्रजित भगत, डॉ. अनंत मरकाळे यांच्या सहकार्याने स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसर स्वच्छ केला. यातून स्वयंसेवकांना स्वच्छतेचे महत्त्व कळले. यावेळी राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख प्रा. आर. आर. पाटील यांचे सहकार्य लाभले.

**१२. संत गाडगेबाबा पुण्यतिथी :**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दि. २० डिसेंबर २०२० रोजी संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यानिमित्ताने महाविद्यालयात कार्यक्रमाधिकारी डॉ. इंद्रजित भगत, डॉ. अनंत मरकाळे यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली श्रमदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक उपस्थित होते.

**१३. वृक्षारोपण उपक्रम :**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दि. १९ ऑगस्ट २०२० रोजी वृक्षारोपन कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी एकूण २५ वृक्षांची लागवड महाविद्यालय परिसरात करण्यात आली. या उपक्रमात प्राचार्य. डॉ. व्ही. जी. गुंडरे, उपप्राचार्य डॉ. रमेश शिंदे, कार्यक्रमाधिकारी डॉ. इंद्रजित भगत, डॉ. अनंत मरकाळे व रा.से.यो. विभागातील स्वयंसेकासमवेत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला होता.

**१४. रक्त दान शिबीर :**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दि. २४.१२.२०२० रोजी मा. शरदचंद्र पवार साहेब यांच्या वाढदिवसा निमित्त महाविद्यालयात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ४० स्वयंसेवकांनी रक्तदान केले. यासाठी स्वामी रामानंद तिर्थ वैद्यकिय महाविद्यालय अंबाजोगाई च्या रक्तीपेठीचे विशेष सहकार्य लाभले.

**१५. व्यसनमुक्ती वेबिनार :**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दि. १२.०१.२०२१ रोजी व्यसनमुक्ती अभियानाअंतर्गत व्यसनमुक्ती वेबिनार घेण्यात आला. यामध्ये डॉ. प्रशांत दहिरे स्वामी रामानंद तिर्थ वैद्यकिय महाविद्यालय अंबाजोगाई यांनी मार्गदर्शन केले. तसेच दुसरे व्याख्याते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. टी. आर. पाटील यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीनेयामध्ये विद्यार्थ्यांना व्यसनापासुन दुर राहण्याची शपथ देण्यात आली. तसेच व्यसनामुळे होणाऱ्या रोगांविषयी माहिती देणारे पोस्टर प्रदर्शन करण्यात आले.

**१६. रस्ता सुरक्षा अभियान :**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व उप्रपादेशीक परिवहन अधिकारी कार्यालय अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने ३२ वे रसता सुरक्षा अभियान २०२१ हे दि. १८.०१.२०२१ ते १७.०२.२०२१ या कालावधीत राबविण्यात येत असुन या रस्ता सुरक्षा अभियानाचे उद्घाटन दि. २०.०१.२०२१ रोजी करण्यात आले. याकार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून पोलीस उपअधिक्षक श्रीमती स्वाती भोर होत्या. तर प्रमुख मार्गदर्शक तहसिलदार श्री शरद झाडके हे होते. यावेळी उप्रपादेशीक परिवहन अधिकारी श्री दत्तात्र्य सांगोलकर यांनी रस्ता सुरक्षे विषयी नियम सांगुन मागदर्शन केले. तसेच यावेळी प्राचार्या वनमाला गुंडरे यांनी मागदर्शन केले. या यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. इंद्रजित भगत व डॉ. अनंत मरकाळे व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१७. लोकशाही पंधरवाडा :**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दि. २६ जानेवारी ते १० फेब्रु. २०२१ या दरम्यान महाविद्यालयात लोकशाही पंधरवाडा साजरा करण्यात आला. यानिमित्त दि. १० फेब्रु २०२१ रोजी डॉ. दिनकर तांदळे यांनी मार्गदर्शन केले. तसेच यानिमित्त निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, पंचायत समिती अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रमाधिकारी डॉ. इंद्रजित भगत व डॉ. अनंत मरकाळे, यांनी केले.

**१८. मास्क वाटप :**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दि. १२.०३.२०२१ रोजी स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेचा लोगो असलेले मास्क वाटप करण्यात आले. यावेळी यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाईच्या विकास समितीचे सदस्य डॉ. नरेंद्र काळे उपस्थित होते.

कार्यक्रमाधिकारी                                        प्राचार्या




कोरोना विषयी जनजागरण मोहिम






टाळेबंदीच्या काळात आर्थिक दुर्बल लोकांना धान्य वाटप








दत्तक ग्राम सेलुआंबा येथे टाळेबंदीच्या काळात आर्थिक दुर्बल लोकांना धान्य वाटप करतांना स्वंयसेवक







परिक्षेच्या काळात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांना सॅनिटाईज करण्यात आले. तसेच वर्ग खोल्या सॅनिटाईज करण्यात आल्या.







राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजीत रक्तदान शिबिरात रक्त दान करतांना स्वंयसेवक





राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करतांना स्वंयसेवक





राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने जागतीक एड्स दिनानिमीत्त आयोजीत रांगोळी स्पर्धेत सहभागी स्वयंसेवक






व्यसनमुक्ती कार्यक्रमात ऑनलाईन सहभागी मान्यवर




व्यसनमुक्ती कार्यक्रमात ऑनलाईन मार्गदर्शन करतांना डॉ. टी. आर. पाटील सर व सहभागी मान्यवर




व्यसनमुक्ती कार्यक्रमात ऑनलाईन सहभागी मान्यवर




रस्ता सुरक्षा अभियाना अंतर्गत मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. वनमाला गुंडरे व मंचावर उपस्थित इतर मान्यवर.




रस्ता सुरक्षा अभियाना अंतर्गत मार्गदर्शन करतांना उपप्रादेशीक परिवहन अधिकारी अंबाजोगाई श्री दत्ता्त्र्य सांगोलकर व मंचावर उपस्थित इतर मान्यवर.



राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने महाविद्यालय परिसरात वृक्षरोपन करतांना प्राचार्य डॉ. वनमाला गुंडरे उपप्राचार्य डॉ. रमेश शिंदे प्रा. पी के. जाधव व इतर मान्यवर



करोना विषाणुच्या पार्श्वभुमीवर स्वयंसेवकांना मास्क वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित मा. डॉ. नरेंद्र काळे व इतर मान्यवर




राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने संविधान दिनानिमीत्त आयोजीत प्रश्न मंजुषा स्पर्धेत सहभागी विद्यार्थी

